**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून नागपुरात सुरू होणार, राज्याची आर्थिक स्थिती ओढाताणीची, मात्र दिवाळखोरीकडे वाटचाल नसल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- देशातल्या विमानसेवा व्यवस्थित कार्यरत असून इंडिगोच्या सेवेत सातत्यानं सुधारणा होत असल्याची नागरी विमानवाहतूक मंत्रालयाची ग्वाही
- मध्य प्रदेशात, ७७ लाखाचं बक्षीस असलेल्या कमांडरसह १० नक्षलवाद्यांचं मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण
- गोव्यात नाईट क्लबमध्ये लागलेल्या आगीमुळे मरण पावलेल्यांची संख्या २५ वर

**आणि**

- पुणे मॅरेथॉनमध्ये महिला गटात भारताची साक्षी जडिया, तर पुरुष गटात इथियोपियाचा टेरेफे हैमानोत यांनी पटकावलं विजेतपद

**<><><><><>**

महाराष्ट्र विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून नागपूर इथं सुरूवात होत आहे. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी अधिवेशनाच्या तयारीचा आढावा घेतला. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे देखील यावेळी उपस्थित होत्या.

अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्र्यांनी आयोजित केलेल्या चहापानावर विरोधी महाविकास आघाडीनं बहिष्कार टाकला. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अनिल देशमुख, आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव यांनी आज वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडलं आहे, असा आरोप वडेट्टीवार

यांनी केला. तर, राज्यात अल्पवयीन मुली असुरक्षीत आहेत, कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली आहे, महार वतनाची जमीन नियमबाह्य पद्धतीनं खरेदी केल्याप्रकरणी जमीन विकत घेणाऱ्यांविरोधात कारवाई होत नाही, अशी टीका भास्कर जाधव यांनी केली.

**<><><><><>**

राज्याची आर्थिक स्थिती ओढाताणीची असली, तरी राज्य दिवाळखोरीकडे चाललेलं नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नागपूरच्या रामगिरी बंगल्यावर झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते.

***होल्ड… बाईट- देवेंद्र फडनवीस***

विरोधकांनी परंपरा पाळत चहापानावर बहिष्कार टाकला. त्यांची पत्रकार परिषद निराशेनं भरलेली आणि त्रागा करणारी होती, अशी टीका त्यांनी केली. राज्यातल्या जवळपास ९० टक्के पूरस्थितीबाधित शेतकऱ्यांना मदतीची रक्कम पोहोचली असल्याचा दावा करून, शेतकऱ्यांना मदत न मिळाल्याचं विरोधकांचं विधान अभ्यास न करता केलेलं आहे, असं फडनवीस म्हणाले. या सगळ्या विषयांवर अधिवेशनात चर्चा करायला सरकार तयार आहोत, विरोधकांच्या प्रश्नाला समर्पक उत्तर देऊ, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी लागलेल्या आचारसंहितेमुळे हे अधिवेशन कमी दिवसांचं ठेवल्याचं ते म्हणाले केला. विरोधी पक्षनेत्याबाबतचा निर्णय सर्वस्वी विधानसभा अध्यक्ष आणि विधानपरिषदेंच्या सभापतींच्या आखत्यारीतला आहे, त्याबाबतीत सरकारचा आग्रह किंवा दुराग्रह नाही, असं स्पष्टीकरण फडनवीस यांनी दिलं. या हिवाळी अधिवेशनात एकंदर १८ विधेयकं सरकार मांडणार असून विदर्भ-मराठवाड्याच्या प्रश्नांवर अधिकाधिक चर्चा करायचा प्रयत्न करू, असं आश्वासनही त्यांनी दिलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला दीडशे वर्षं झाल्यानिमित्त उद्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभेत या गीतावर चर्चा होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या चर्चेला सुरुवात करणार आहेत. दुपारी बारा वाजता चर्चेला सुरुवात होणार आहे. त्याचप्रमाणे निवडणूक सुधारणा या विषयावर ९ डिसेंबरला चर्चा होणार असल्याचं सर्वपक्षीय बैठकीत निश्चित झालं आहे.

**<><><><><>**

देशातल्या विमानसेवा व्यवस्थितपणे आणि पूर्ण क्षमतेनं कार्यरत असून इंडिगोच्या सेवेत सातत्यानं सुधारणा होत आहे, अशी ग्वाही नागरी विमानवाहतूक मंत्रालयानं आज दिली. विमानांची वेळापत्रकं पूर्वपदावर येत असल्याचंही मंत्रालयानं निवेदनाद्वारे सांगितलं. आज दिवसअखेरपर्यंत इंडिगोची उड्डाणं १ हजार ६५० पर्यंत पोहोचण्याची आशा आहे, असंही यात नमूद केलं आहे.

इंडिगोनं आज मुंबई आणि दिल्ली विमानतळावरून २२०पेक्षा जास्त उड्डाणं रद्द केली. मात्र, लवकरच आपली सेवा पूर्ववत करायचे प्रयत्न सुरू असून पंधराशेहून जास्त उड्डाणं चालवायचं आश्वासन इंडिगोनं आपल्या निवेदनात दिलं आहे.

गेल्या काही दिवसांपासून विमान उड्डाणांवर झालेल्या परिणामामुळे भारतीय रेल्वेनं आपल्या विविध विभागांमध्ये पुढच्या दोन दिवसांसाठी ८९ विशेष गाड्या सोडायची घोषणा केली आहे. मध्य रेल्वे विभागात पुणे ते बंगळुरू, पुणे ते दिल्ली, आणि मुंबई ते दिल्ली, यासह विविध मार्गांवर १४ विशेष गाड्या, पश्चिम रेल्वे विभागात भिवानी ते मुंबई, आणि मुंबई ते शकुरबस्ती, अशा विविध मार्गांवर ७ विशेष गाड्या सोडल्या जाणार आहेत. दक्षिण मध्य रेल्वे विभागात चेरलापल्ली ते

शालीमार, सिंकदराबाद ते चेन्नई- एगमोर, आणि हैदराबाद ते मुंबई, अशा ३ विशेष गाड्या चालवल्या जातील.

<><><><><>

मध्य प्रदेशात बालाघाट जिल्ह्यात १० नक्षलवाद्यांनी आज मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केलं. त्यात ७७ लाख रुपयांच बक्षीस असलेल्या सुरेंदर उर्फ कबीर या नक्षलवादी नेत्याचा समावेश आहे. नक्षलवादाचं संपूर्ण निरमूलन करुन मध्य प्रदेशाला नक्षलमुक्त करमं हे राज्य सरकारचं उद्दिष्ट आहे, असं मुख्यमंत्री मोहन यादव यांनी यावेळी सांगितलं. पुनर्वसन धोरणामुळे, वाट चुकलेल्या लोकांना सन्मानाचं आयुष्य जगण्यासाठी मुख्य प्रवाहात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

आज सशस्त्र सेना ध्वज दिन आहे. देशाचं संरक्षण करणाऱ्या जवानांचा आणि शहिदांचा सन्मान करण्यासाठी १९४९ पासून, ७ डिसेंबर हा दिवस सशस्त्र सेना ध्वज दिन म्हणून पाळला जातो. या दिनानिमित्त उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आज सशस्त्र सेना ध्वज दिन निधीसाठी त्यांचं एका महिन्याचं वेतन दान केलं.

<><><><><>

गोव्यात आरपोरा इथल्या एका नाईट क्लबमध्ये काल रात्री लागलेल्या आगीमुळे मरण पावलेल्यांची संख्या २५ वर पोहोचली आहे. मृतांमध्ये चार पर्यटकांसह बहुतांश क्लबच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. ही आग गॅस सिलिंडर स्फोटामुळे लागल्याचा प्रथमिक अंदाज आहे. आग लागलेल्या ठिकाणावरून सर्व मृतदेह बाहेर काढले असून, पोलीस पुढचा तपास करत आहे.

या क्लबला योग्य तपासणी न करता परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांसह, प्रत्येक जबाबदार व्यक्तीविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असं गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी म्हटलं आहे. दरम्यान राष्ट्रपती, उपराष्ट्रपती,

प्रधानमंत्री, गृहमंत्री आणि संरक्षण मंत्र्यांसह अनेकांनी या दुर्घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त केला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदतही जाहीर केली आहे.

**<><><><><>**

पुणे मॅरेथॉनमध्ये पूर्ण मॅरेथॉन महिला गटात भारताची साक्षी जडिया हिनं विजेतेपद पटकावलं. आज झालेल्या या स्पर्धेत तिनं २ तास, ३९ मिनिटं आणि ३७ सेकंद इतक्या वेळेत ही शर्यत पूर्ण केली. दुसरा आणि तिसरा क्रमांक इथियोपियाच्या धावपटूंनी पटकावला.

पूर्ण मॅरेथॉनच्या पुरुष गटात इथियोपियाचा टेरेफे हैमानोत यानं २ तास, २० मिनिटं, ८ सेकंदांत शर्यत पूर्ण करून जेतेपद मिळवलं. दुसरा क्रमांक इथियोपियाच्या धावपटूनं मिळवला, तर भारताचा त्रिथा पुन तिसऱ्या क्रमांकावर राहिला.

अर्ध मॅरेथॉनमध्ये पुरुष गटात भारताचा सचिन यादव यानं पहिला, राज तिवारी यानं दुसरा आणि मुकेश कुमार यानं तिसरा क्रमांक मिळवला, तर महिलांच्या अर्ध मॅरेथॉनमध्ये भारती हिनं पहिलं आणि रविना गायकवाड हिनं दुसरं स्थान मिळवलं. याशिवाय, १० किलोमीटर, ५ किलोमीटर आणि व्हिलचेअर स्पर्धाही उत्साहात पार पडली.

**<><><><><>**

गुवाहाटी मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत आज संस्कार सारस्वत या खेळाडूने पुरुष एकेरीचं विजेतेपद जिंकलं. अंतिम फेरीत त्याने भारताच्याच मिथुन मंजुनाथचा २१-११, १७-२१, २१-१३ असा पराभव केला. पुरुषांच्या दुहेरी गटात पृथ्वी कृष्णमूर्ती

रॉय आणि के. साई प्रतीक या भारतीय जोडीला अंतिम फेरीत आरोन ताई आणि कांग खाई झिंग या मलेशियन जोडीकडून पराभव पत्करावा लागला.

<><><><>

आयएसएसएफ नेमबाजी स्पर्धेत पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात भारताचा ऐश्वर्य प्रताप सिंह तोमर यानं रौप्यपदक पटकावलं आहे. त्यानं ४१३ पूर्णांक ३ गुणांची कमाई केली. चेकियाच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा पूर्णांक ९ गुण कमी मिळाल्यानं त्याचं सुवर्णपदक थोडक्यात हुकलं. दोहा इथं सुरू झालेल्या या स्पर्धेतलं भारताचं हे चौथं पदक आहे.

<><><><>

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी आज गुजरातमधल्या अहमदाबाद इथं विविध विकास कामांचं उद्घाटन आणि भूमिपूजन केलं. अहमदाबादच्या थलतेज परिसरातल्या ८६१ घरांचं त्यांनी उद्घाटन केलं. दक्षिण बोपलमध्ये इलेक्ट्रोथर्म कंपनीनं अहमदाबाद महानगरपालिकेच्या सहकार्यानं विकसीत केलेल्या इलेक्ट्रोथर्म बागेचं, शाह यांनी उद्घाटन केलं. याशिवाय, सरखेज आणि वस्त्रपूर इथं तलाव, मेमनगर इथं पार्टी भूखंड आणि नवा वडाज इथल्या साडेतीनशे घरांचं उद्घाटन केलं. न्यू रणीप इथली व्यायामशाळा आणि वाचनालयाला भेट दिल्यानंतर त्यांनी गोता इथल्या क्रीडा संकुलाचंही त्यांनी भूमिपूजन केलं.

अहमदाबाद महानगरपालिकेत नव्यानं नियुक्त झालेल्या सुमारे १०० सहायक अग्निशामक जवानांना त्यांनी नियुक्तिपत्रं प्रदान केली. याशिवाय, उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल यांच्या जीवनावर आधारित ‘चुनौतियां मुझे पसंद हैं’ या पुस्तकाच्या गुजराती आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्यालाही ते उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

बेनिन या पश्चिम आफ्रिकेतल्या देशात सैनिकांच्या एका गटाने सरकार बरखास्त करण्याची घोषणा दूरचित्रवाणीवरच्या सरकारी वाहिनीवरून केली आहे. मिलिटरी कमिटी फॉर रिफाऊंडेशन असं या गटाचं नाव असून त्याने सर्व राजकीय नेते आणि प्रशासकीय संस्थांना काढून टाकण्याची घोषणा केली आहे. या गटाने अध्यक्ष पॅट्रिस टॅलोन यांच्या जागी लेफ्टनंट कर्नल पास्कल टिग्री यांना लष्करी समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्त केलं आहे.

**<><><><><>**

नाशिकमध्ये सप्तश्रृंगी गड घाटात एका खासगी कारला झालेल्या अपघातात ५ जण ठार झाल्याचं वृत्त आहे. ही गाडी घाटात सुमारे ६०० फूट दरीत कोसळून हा अपघात झाला. गाडीत एकंदर ६ व्यक्ती होत्या.

**<><><><><>**

नवीकरणीय ऊर्जा क्षेत्राला होणारा अर्थपुरवठा थांबवण्यासंदर्भात कोणतेही दिशानिर्देश सरकारनं जारी केलेले नाहीत, याबाबत प्रसारित होणाऱ्या बातम्या चुकीच्या आहेत, असं नूतन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प आणि उपकरणं उत्पादन केंद्रांना होणारा वित्तपुरवठा थांबवावा, असे निर्देश मंत्रालयानं कोणत्याही वित्तीय संस्थेला दिलेले नाहीत, असंही मंत्रालयानं म्हटलं आहे. जागतिक पातळीवर सौरऊर्जा क्षेत्रात भारताची जागा मजबूत करायला मंत्रालय वचनबद्ध असल्याचंही यात नमूद केलं आहे.

**<><><><><>**

तैवान सामुद्रध्वनीच्या स्थितीत कोणताही बदल होणार नसल्याचं अमेरिकेनं नव्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणात स्पष्ट केलं आहे. इंडो पॅसिफीक क्षेत्रात चीनच्या वाढत्या प्रभावाचा सामना करण्यासाठीही अमेरिकेने कठोर धोरणं राबवण्याचा

निर्णय घेतला आहे. याशिवाय भारतासोबतचे संबंध सुधारण्याविषयी यात भर देण्यात आला आहे.